**L. C. BILL No. IV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE SECURITY GUARDS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1981.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४.**

**महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९८१ चा महा. ५८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



(शा.म.मु.) एचबी ३०३०–१ (५०५–३-२०२५)

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (४) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :– १९८१ चा महा. ५८.

"(४) "आस्थापना" म्हणजे, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ याच्या कलम २ च्या खंड (४) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आस्थापना;". २०१७ चा महा. ६१.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

"(क) सुरक्षा रक्षकांची भरती करणे व त्यांना योजनेत प्रवेश देणे आणि सुरक्षा रक्षकांची नोंदणीपुस्तके व प्रतीक्षा यादी ठेवणे, नोंदणी पुस्तकांतील व प्रतीक्षा यादीतील त्यांची नावे, एकतर तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे किंवा पुन्हा समाविष्ट करणे, आणि नोंदणीसाठी फी लादणे यांसह सुरक्षा रक्षकांची व मूळ मालकांची नोंदणी करणे व नोंदणी रद्द करणे यांचे नियमन करणे ; ".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१अ) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही कारणास्तव सल्लागार समिती कार्यरत नसेल तर, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, सल्लागार समितीच्या सल्ल्याशिवाय किंवा तिच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय, अधिसूचना काढता येईल किंवा निर्णय घेता येईल.";

(२) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (६) (अ) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त, सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्या नावांची अधिसूचना, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल. असे सदस्य, शासनाची मर्जी असेपर्यंत, पद धारण करतील.

(ब) राज्य शासन, राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांची रिक्त पदे, लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत, असे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी भरील.".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, स्पष्टीकरणातील, " चौदा " या मजकुराऐवजी, "अठरा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

एक मंडळ स्थापन करून, त्याद्वारे, महाराष्ट्र राज्यातील कारखाने व आस्थापना यांमध्ये कामावर ठेवलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती आणि त्यांचे कल्याण यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे यांसाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५८) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमात, " आस्थापना " या संज्ञेची व्याख्या, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई ७९) याच्या कलम २ च्या खंड (८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आस्थापना, अशी केली आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) याद्वारे उक्त १९४८ चा दुकाने अधिनियम निरसित करण्यात आल्यामुळे, २०१७ चा नवीन दुकाने अधिनियम यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, " आस्थापना " या संज्ञेचा संदर्भ समाविष्ट करण्याकरिता उक्त व्याख्येत सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १५ मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासनास, उक्त अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीमधून उद्‌भवणाऱ्या, राज्य शासनाकडून सल्ल्यासाठी तिच्याकडे पाठविण्यात येतील अशा बाबींवर सल्ला देण्यासाठी सल्लागार समितीची रचना करता येईल. सल्लागार समितीमध्ये, मूळ मालक, सुरक्षा रक्षक, राज्य विधानमंडळाचे सदस्य व राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा पदावधी, सामान्यपणे तीन वर्षे इतका आहे. सल्लागार समितीचे कामकाज, सुलभपणे चालण्याच्या दृष्टीने, राज्य शासन, राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांच्या रिक्त जागा, लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत, अशा जागा रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी भरील अशी तरतूद करण्यासाठी उक्त कलमात सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

जर कोणत्याही कारणास्तव, काही कालावधीसाठी सल्लागार समिती कार्यरत नसेल तर, राज्य शासनास, सल्लागार समितीच्या सल्ल्याअभावी, उक्त अधिनियमाच्या विविध तरतुदींची अंमलबजावणी करता येऊ शकत नाही अथवा योजना तयार करता येऊ शकत नाही किंवा त्यामध्ये फेरबदल करता येऊ शकत नाही, असे निदर्शनास आले आहे. म्हणून, शासनाला, समिती कार्यरत होईपर्यंत, अधिसूचना काढता येतील किंवा त्याअन्वये निर्णय घेता येतील अशी तरतूद करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या कलम १५ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे शासनास वाटते.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १५ मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. उक्त अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, कोणत्याही मुलास, म्हणजेच, ज्या व्यक्तीचे वय चौदा वर्षे पूर्ण झाले नसेल अशा व्यक्तीस, सुरक्षा रक्षक म्हणून काम करण्यास मनाई करण्याची

तरतूद केली आहे. बाल व किशोरवयीन मुले कामगार (प्रतिबंध व विनियमन) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ६१) यामध्ये, किशोरवयीन मुलांना, म्हणजेच, ज्या व्यक्तीचे वय चौदा वर्षे पूर्ण झाले आहे, परंतु, तिचे वय अठरा वर्षे पूर्ण झालेले नाही अशा व्यक्तीला, जोखीमकारक व्यवसायांमध्ये काम करण्यास मनाई केली आहे. विविध कामगार कायद्यांमध्ये, बालकामगारांची वयोमर्यादा अठरा वर्षांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर, अठरा वर्षे वयाखालील बालकांना सुरक्षा रक्षक म्हणून काम करण्यास मनाई करण्याच्या दृष्टीने, बालकांची उक्त वयोमर्यादा, चौदा वर्षांवरून अठरा वर्षांपर्यंत वाढविणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई ,
दिनांक १८ मार्च, २०२५.

**आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.

**सन २०२५ चे वि. प. वि. क्रमांक ४—महाराष्ट्र खाजगी सुरक्षा (नोकरीचे नियम व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**[ महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यातील उतारे.]**

**(सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८.)**

**१.** * * * *

**२.** (१) * * * * व्याख्या.

(१-अ) * * * *

(२) व (३) * * * *

(४) "आस्थापना" म्हणजे, मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ याच्या कलम २, खंड (८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आस्थापना ;

(५) ते (११) * * * *

**३.** (१) * * * * सुरक्षा रक्षकांना नियमित नोकरी मिळावी हे निश्चित करण्यासाठी योजना.

(२) विशेषकरून योजनेमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) व (ब) * * * *

(क) नोंदणीपुस्तके ठेवणे, नोंदणीपुस्तकातील नावे तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे किंवा पूर्ववत करणे व नोंदणीसाठी लादावयाची फी, यांसह सुरक्षा रक्षकांची भरती व त्यांना योजनेत दाखल करून घेणे आणि सुरक्षा रक्षक व मालक यांची नोंदणी यांचे नियमन करणे ;

(ड) ते (न) * * * *

(३) व (४) * * * *

**४.** ते **१४.** * * * *

**१५.** (१) ते (५) * * * * सल्लागार समिती.

(६) सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी विहित करण्यात येईल असा असेल.

(७) * * * *

**१६.** व **१७.** * * * *

**१८.** कोणत्याही मुलास सुरक्षा रक्षक म्हणून काम करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा त्यास तशी परवानगी देण्यात येणार नाही. मुलांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध.

**स्पष्टीकरण.**— "मूल" म्हणजे ज्या व्यक्तीच्या वयाची चौदा वर्षे पूर्ण झाली नसतील अशी व्यक्ती.

**१९.** ते **३१.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४. ]**

**[ महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.**]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.